प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र.१ चा उलटतपास वादीतर्फे ॲड. श्री.पळसपगार वकिलांमार्फत शपथेवर सुरू .

१. वादीतर्फे देविदास नारायण सालफळे यांना प्रस्तुत प्रकरण चालविण्याबाबतचे अधिकारपत्र मी पाहिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे प्रस्तुत प्रकरण देविदास सालफळे यांना चालविण्याचा अधिकार नसल्याचे माझ्या प्रतिज्ञापत्रात खोटे नमुद करण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की, करारनामा (निशाणी क्र.३९) वर माझी सही आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी वाद दुकान रू.दोन लाख देवून वादी कडून कमिशनच्या आधारे घेतले होते. मला मराठी लिहिता–वाचता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या प्रतिज्ञापत्रातील मजकुर हा मराठीत असल्याने मला तो माहिती नाही.

२. हे म्हणणे खरे आहे की, करारपत्र (निशाणी क्र.३९) नुसार वाद दुकानाचा ताबा मी संस्थेला दिल्यानंतर संस्था ही मला रू.दोन लाख परत करण्याचे वादी व माझ्यात ठरले होते. हे म्हणणे खरे आहे की, मी करारपत्रानुसार वादीस वाद दुकानाचा ताबा दिला नाही. हे म्हणणे खरे नाही की, वाद दुकान मला वादी संस्थेने भाडेतत्वार दिल्याचे माझ्या प्रतिज्ञापत्रात चुकीचे व खोटे नमुद करण्यात आले. हे म्हणणे खरे नाही की, वाद दुकान मला कमिशनच्या आधारे वादीने दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी वादीस नियमितपणे ठरलेले भाडे देत असल्याचे माझ्या प्रतिज्ञापत्रात खोटे नमुद करण्यात आले.

३. हे म्हणणे खरे नाही की, मी ऑगस्ट–२०१३ पर्यंत वादीस नियमितरीत्या कमिशन दिले. साक्षिदार स्त:हून सांगतो की, मी नियमितरीत्या वादीस ऑगस्ट–२०१३ पर्यंत भाडे दिले. हे म्हणणे खरे नाही की, संप्टेबर–२०१३ ते डिसेबंर–२०१४ पर्यंतचे एकूण रू.९५,२३२/– माझ्याकडे थकबाकी आहे. आता मला माझ्या प्रतिज्ञापत्रातील अधोरेखांकीत भाग–अ वाचुन दाखविण्यात आला. तो बरोबर आहे. कमिशन व टॅक्सच्या पावत्या मी अभिलेखावर दाखल केल्या नाहीत.

४. हे मला माहिती नाही की, वादी संस्थेने वाद दुकान व त्या क्षेत्रफळातील जागा महानगरपालिका, अकोला यांच्याकडून लिजवर घेतली होती किंवा कसे. हे मला माहिती नाही की, त्याबाबत वादी संस्था ही महानगरपालिका, अकोला यांना नियमितरीत्या कर देत होती किंवा कसे. हे मला माहिती नाही की, वादी व महानगरपालिका यांच्यामध्ये वाद दुकानांबाबतचा वाद दिवाणी न्यायालय, अकोला येथे चालू होता किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, त्याबाबतची जाणीव असल्याने मी हेतुपुरस्पर वादीस कमिशन व कर न देण्याचे उद्देशाने प्रस्तुत वाद जागेचे कमिशन व ताबा वादीस दिला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी करारपत्र निशाणी क्र.३९ चा भंग केला. हे म्हणणे खरे आहे की, मी वाद दुकानाचा ताबा महानगरपालिका अकोला यांना परस्पर दिला. हे म्हणणे खरे आहे की, मला वाद दुकानाचा ताबा कोणत्याही न्यायालयामार्फत मिळालेला नाही.

५. प्रस्तुत प्रकरण दाखल करण्यापूर्वी माझ्यात व महानगरपालिका यांच्यात कोणताही करारनामा झाला नव्हता व कोणतेही भाडे व कर मी महानगरपलिकेला प्रस्तुत दावा दाखल करण्यापूर्वी दिले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, वाद दुकान ठेवण्याकरीता मी वाद दुकानाचे भाडे व कर महानगपालिका अकोला यांना वादीच्या संमतीशिवाय दिले. हे म्हणणे खरे नाही की, माझ्याकडे वादी संस्थेचे कमिशन व करची रक्कम एकूण रू.९५,२३२/– आजरोजी देखील थकीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटा पुरावा दाखल केला व खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास काही नाही.

समक्ष

**Sd/–**

दिनांक: १८.०३.२०२६ (व्ही. व्ही. जोशी)

ठिकाण: अकोला न्यायाधीश

सहकार न्यायालय, अकोला.